# आरोग्य हे देशाच्या प्रगतीचे मानक

## पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने; देगलूरला चिद्रावार स्मृती व्याख्यानमाला

**देगलूर, ता. ४ (बातमीदार)** : अखिल मानव जातीच्या कल्याणात आरोग्य सेवेचे सर्वात मोठे योगदान आहे. कोणत्याही देशाची प्रगती त्या देशातील नागरिकांचे आरोग्य कसे आहेत? यावर अवलंबून असते. म्हणून आरोग्य हे देशाच्या प्रगतीचे मानक (इंडिकेटर) आहे, असे प्रतिपादन पदमश्री डॉ. तात्याराव लहाने यांनी केले.

ज्येष्ठ समाजवादी नेते तथा देगलूरचे माजी नगराध्यक्ष नारायणराव चिद्रावार स्मृती व्याख्यानमालेत प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. या व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी आमदार जितेश अंतापुरकर होते. व्यासपीठावर एसटी परिवहन महामंडळाचे उपाध्यक्ष शेखर चन्ने, भागवताचार्य अनंत महाराज बेलगावकर, माजी आमदार गंगाधरराव पटणे आदी उपस्थित होते. प्रारंभी नारायणराव चिद्रावार यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून व्याख्यानमालेस प्रारंभ करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून किरण चिद्रावार यांनी नारायणराव चिद्रावार यांच्या जीवनावर व केलेल्या विकास कामावर प्रकाश टाकला.

आधुनिक समाजात मानवी जीवन सुखी, समाधानी व आनंदीत बनवायचे असेल तर उत्तम आरोग्य असल्याशिवाय पर्याय नाही. मानवी जीवन यशस्वी करावयाचे असेल नियमित चालणे, व्यायाम करणे व संतुलित आहार ठेवणे आवश्यक आहे. एकविसाव्या शतकात माहिती व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये मानवाने नेत्रदीपक क्रांती केली तरी मोबाईलच्या अतीवापराचा नकारात्मक परिणाम प्रत्येकाच्या डोळ्यावर पडत असल्याचे त्यांनी सांगितले.



**देगलूर : नारायणराव चिद्रावार स्मृती व्याख्यानमालेच्या उद्घाटन प्रसंगी पदमश्री डॉ. तात्याराव लहाने, आमदार जितेश अंतापुरकर, शेखर चन्ने, गंगाधरराव पटणे, किरण चिद्रावार, अनंत महाराज बेलगावकर आदी उपस्थित होते.**

प्रारंभी प्रा. गौतम भालेकर व प्रकाश सोनकांबळे यांनी स्वागत गीत सादर केले. प्रा. राजेश्वर दुडुकनाळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमास डॉ. विनायक मुंडे, मुख्याधिकारी सुंदर बोदंर, अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर, सचिव शशीकांत चिद्रावार, सहसचिव सुर्यकांत नारलावार, डॉ. रवींद्र, प्रकाश, अरुण आणि गुरुराज चिद्रावार, ॲड. मोहसीन अली, एम. एच. शेख, महेश पाटील, अनिल तोताडे, अविनाश निलमवार, प्रा. सर्जेराव रणखांब, प्रा. उत्तमकुमार

Scanned with OKEN Scanner